## <u>संक्षिप्त संपरीक्षा</u>

१. खटल्याचा क्रमांक – १७३८/२०१८ २. गुन्ह्याचा दिनांक – १९/०६/२०१८

३. दाखल दिनांक – १९/०६/२०१८ ४. तक्रारदाराचे नांव – यु. एच. शेख, रेसुब, हडपसर.

५. आरोपीचे नांव – दशरथ उत्तम कोळी, वय – २९ वर्षे, रा. जाधव वस्ती, मुंढवा, पुणे.

६. गुन्ह्याचा तपशिल – तुम्ही दिनांक १९/०६/२०१८ रोजी सकाळी १०.३८ वाजता हडपसर रेल्वे स्थानकावर लघवी करत असताना मिळून आला आणि तुम्ही भारतीय रेल्वे कायदा कलम १४५ अन्वये अपराध केलेला आहे.

आरोपीचे निवेदन–

प्र.१ – तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्र.२ – तुम्हाला आता गुन्हा वाचून व समजावून दाखविला तो समजला काय ?

उत्तर – होय.

प्र.३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर – होय.

प्र.४ – तुम्हाला सरकारी खर्चाने वकील पाहिजे काय ?

उत्तर – होय.

–––––––––––––

आरोपीची सही प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी

दिनांक १९/०६/२०१८ लोहमार्ग न्यायालय, दौंड.

## <u>आदेश</u>

आरोपीने स्वच्छेने गुन्हा कबूल केलेला आहे. त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असल्यामुळे त्याला कमीत–कमी शिक्षा करण्यात यावी. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. आरोपीने सांगितले आहे की, हा त्याचा पहिला गुन्हा आहे. सदरील केसमधील कागदपत्रे त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिध्द करीत नाहीत. तसेच गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ नुसार भारतीय रेल्वे कायदा कलम १४५ अन्वये दोषी ठरवून रुपये ५,००/– दंड करण्यात येत आहे. दंड भरण्यास कसूर केल्यास पुढे आणखी ५ दिवसांची शिक्षा ठोठावण्यात येते.

सही/–

**दिनांक १९/०६/२०१८** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग**

**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**